05-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04-06-2025 21:19 Page 1

निवडक

संड्यू अपार्टमेंट फिडरवर उद्या वीज पुरवठा खंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ४ : संड्यू अपार्टमेंट फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. ६ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आयसीआयसीआय बँकेसमोर, सनी स्टेशनरी आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे अस्नोडा फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने दि. ६ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत गणेश नगर डीटीसी, पाईप फॅक्टरी, सेंट क्लारा डीटीसी आणि खोरीवाडा भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

सिटी फीडर उद्या वीज पुरवठा खंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ४ : ११ केव्ही सिटी फीडर, ११ केव्ही चर्च फीडर, ११ केव्ही एअरपोर्ट फीडर, ११ केव्ही न्यू वाडे फीडर, ११ केव्ही वाडे लेक फीडर आणि ३३ केव्ही एमपीए, ३३ केव्ही अदानी, ३३ केव्ही जेएसडब्ल्यू, ३३ केव्ही झेडआयएव्ही, वास्को फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने ६ जून २०२५ रोजी सकाळी ८.०० ते ९.३० वाजेपर्यंत सेंट अँड्रयू कॉलेज ते रेल्वे सर्कलपर्यंत, व्होलांत, मुंडवेल, मायमोळे, खारीवाडा, पीशी डोंगरी, नॉन-मोन, मांगूर टेकडी फक्त कोमुनिदाद हॉल, आनंद रेसिडेन्सी डीटीसी, जैन मंदिर डीटीसी, आनंद आर्केड डीटीसी, जॉगर्स पार्क चिखली जवळचा परिसर, कॉटेज हॉस्पिटल जवळचा परिसर, मोगुबाई इस्टेट, नेरा बीएसएनएल टॉवर, आल्त चिखली, एसएमआरसी हॉस्पिटल, जीएसएल कॉलनी चिखली, संपूर्ण नवीन वाडे, शांतीनगर, वाडे, मेरशी वाडे, चिखली भाग (बीएसएनएल जवळ) आणि चाफेरन भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

शिवण काम प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी अर्ज

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ४ : कामगार आणि रोजगार खात्याच्या कामगार कल्याण केंद्रांमार्फत राज्यातील विविध केंद्रावर आयोजित करण्यात येणाऱ्या दहा महिन्याच्या भरतकाम, सुईकाम, कटिंग आणि टेलरिंग या अभ्यासक्रमासाठी अर्ज मागविले आहेत. १ जुलै २०२५ रोजी पासून अभ्यासक्रमास सुरवात होईल.

प्रशिक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या औद्योगिक कामगारांच्या मुलांना आणि अवलंबितांना जवळच्या कामगार कल्याण केंद्रांमध्ये अर्ज करण्याची विनंती केली आहे आणि अधिक माहितीसाठी जवळच्या कामगार कल्याण केंद्रावर संपर्क करावा.

कामगार कल्याण केंद्र, कामगार निरीक्षक कार्यालय, सरकारी कार्यालय प्रकल्प, पेडणे, कामगार कल्याण केंद्र, नंदकुमार तोरस्कर परबवाडो तोरसे, पेडणे, कामगार कल्याण केंद्र, टाऊन सेंटर कॉम्प्लेक्स, दुसरा मजला डिचोली, कामगार कल्याण केंद्र, सहाय्यक कामगार आयुक्त, सरकारी कार्यालय प्रकल्प फोंडा, कामगार कल्याण केंद्र, उपआयुक्त कार्यालय ब्लेसिंग पायोनियरिंग कमर्शियल प्रकल्प, जिल्हा सत्र न्यायालयासमोर, जुने बाजार, मडगाव, कामगार कल्याण केंद्र, सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, दुरादो इमारत, वास्को, कामगार कल्याण केंद्र, बाणावली, कामगार कल्याण केंद्र, विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था, वाडे, कुर्डी, सांगे येथील केंद्रांवर संपर्क करावा. अधिक माहितीसाठी आयुक्त, कामगार आणि रोजगार कार्यालय, कामत टॉवर, ७ वा मजला, पाटो प्लाझा, पणजी, संपर्क क्रमांक ९५११२५८९०७ येथे संपर्क साधावा.

सासष्टीत एफडीएची कारवाई : विनापरवाना अन्न व्यवसाय केले बंद

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ३ : गोवा अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) सासष्टी तालुक्यात अस्वच्छ आणि परवाना नसलेल्या अन्न उत्पादन व वितरण करणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाई केली. अन्न सुरक्षेच्या दृष्टीने ही मोहीम राबवण्यात आली असून, विविध तक्रारी आणि नियमित तपासणीच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली आहे.

एफडीएच्या दक्षिण गोवा विभागाचे निरीक्षक संज्योत कुडाळकर यांच्या नेतृत्वाखाली अन्न सुरक्षा अधिकारी माधव कवळेकर आणि प्रदीक्षा चोपडेकर यांनी ही कारवाई केली. तपासणीदरम्यान काही आस्थापनांमध्ये गंभीर नियमभंग आढळून आले, ज्यामुळे तातडीने कारवाई करण्यात आली.

तपासणीदरम्यान नुवे येथील एका बेकरीमध्ये अत्यंत अस्वच्छ परिस्थितीत 'पाव' तयार केला जात असल्याचे आढळून आले. संबंधित युनिटकडे आवश्यक परवाना नव्हता. याशिवाय लोटली येथील दोन रेस्टॉरंट्सही आरोग्यविषयक निकषांचे उल्लंघन करत असल्यामुळे तात्काळ बंद करण्यात आली.

एक केटरिंग युनिट तपासणीच्या वेळी निकृष्ट अवस्थेत आढळले. गळके सोक पिट, उघड्या भिंती, खराब फरशी, लेबल नसलेले अन्नपदार्थ आणि स्वच्छतेचा अभाव यासह अनेक त्रुटी आढळल्या. एक किरकोळ विक्रेता परवाना नसलेल्या घरगुती स्वयंपाकघरातून स्नॅक्स विकत असल्याचेही उघड झाले. तर दुसऱ्या केटरिंग युनिटमध्ये छतावरील उघड्या जागेत अन्नपदार्थांची हाताळणी होत असल्याचे दिसून आले. या सर्व अन्न व्यवसाय चालकांना तपासणी अहवाल देण्यात आला असून अन्न सुरक्षा नियमांचे पालन न केल्यास दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

राज्याचे आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी गोव्यातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने एफडीएच्या मोहीमांचे समर्थन केले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, अन्न सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यासाठी अशी कारवाई सातत्याने राबवली जाणार आहे. एफडीएने नागरिकांना देखील आह्वान केले आहे की, अशा प्रकारच्या नियमभंगांची माहिती त्यांनी प्रशासनापर्यंत पोहोचवावी, जेणेकरून मिशन हेल्दी गोवा' उपक्रमाला अधिक बळ मिळेल.

मासेमारी ट्रॉलर्सच्या बेकायदेशीर पार्किंगवर कारवाई

स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी | नुकसान भरपाईची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ४ : इल्हा दे राशोल येथील मासेमारी ट्रॉलर्सची बेकायदेशीर पार्किंग, कामगारांचे अस्वच्छ वर्तन आणि स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला निर्माण झालेल्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर मत्स्यव्यवसाय विभाग आणि राशोल ग्रामपंचायतीने संयुक्त तपासणी मोहीम राबवली.

या कारवाईदरम्यान राशोलचे सरपंच जोसेफ वाझ आणि अन्य अधिकाऱ्यांनी ट्रॉलर्सवर काम करणाऱ्या स्थलांतरित मजुरांची विचारपूस केली. यावेळी सरपंच वाझ यांनी स्पष्टपणे सांगितले की, कामगारांनी सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर शौच केल्याचे मान्य केले असून, काही ट्रॉलर्सना तात्पुरत्या निवासस्थानी रूपांतरित करण्यात आले आहे. या प्रकारामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी असून त्यांनी त्वरित कारवाई व नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

पंचायतीने यापूर्वी गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी कडे तक्रार दाखल केली होती. या अनुषंगाने सरपंच वाझ यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. या निवेदनात आरोप करण्यात आला की, ट्रॉलर आणि बोट मालक

चॅपल परिसर व फुटबॉल मैदानाच्या लगत त्यांच्या जहाजांचे बेकायदेशीर पार्किंग करत असून, हे समुद्रकिनारी नियमन क्षेत्र सीआरझेड नियमांचे सरळ उल्लंघन आहे.

या बेकायदेशीर हालचालीमुळे पंचायत स्थापत्याने उभारलेली संरक्षण भिंतही नुकसानग्रस्त झाली आहे. शिवाय, स्थानिक मच्छीमारांच्या पारंपरिक जहाजांच्या हालचालीसही यामुळे अडथळा निर्माण झाला आहे, असे पंचायतीने स्पष्ट केले. अस्वच्छतेच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. ट्रॉलर्सवर वास्तव्यास असलेले स्थलांतरित कामगार नदीकाठी उघड्यावर शौच करत असल्यामुळे डेंग्यूसारखे आजार पसरू शकतात, अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. पंचायतीने गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीकडे स्थलांतरित मजुरांना योग्य ठिकाणी हलवण्याची विनंती केली असून, त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी मूलभूत स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्याची आणि त्यांची आरोग्य तपासणी करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून गावाच्या सार्वजनिक आरोग्यावर परिणाम होणार नाही.

भुमीपुत्रांच्या हक्कांवर आक्रमण खपवून घेणार नाही : कॅ. विरीयातो

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ४ : दक्षिण गोव्याचे खासदार विरियातो फर्नांडिस यांनी आपल्या खासदारकीच्या पहिल्या वर्षपूर्तीनिमित्त मडगाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत राज्य सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका केली. गोव्याच्या भूमीची होणारी विक्री, ॲप-आधारित टॅक्सी ॲग्रीगेटर्सची अंमलबजावणी आणि आरोग्यसेवा व्यवस्थेतील अपयश यावर त्यांनी सरकारला जाब विचारला.

फर्नांडिस यांनी बाहेरील गुंतवणूकदारांकडून मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या जमिनीच्या खरेदीकडे लक्ष वेधत सांगितले की, ही खरेदी गोव्याच्या सामाजिक आणि पर्यावरणीय रचनेला धोका पोहोचवू शकते. त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, बेकायदेशीर बांधकाम अथवा स्थानिकांच्या हक्कांना बाधा आणणाऱ्या कोणत्याही प्रकल्पांना काँग्रेस पक्ष विरोध करेल. यासोबतच त्यांनी सांकवाळ भूटानी रिअल इस्टेट प्रकल्पाचा उल्लेख करून, अशा प्रकल्पांमुळे गोमंतकीयांच्या अस्तित्वावर गदा येत असल्याचे नमूद केले.

फर्नांडिस म्हणाले की, राज्य सरकारने ज्या कायद्यांद्वारे मोठ्या प्रमाणावर जमिनीचे रूपांतर आणि विक्री सुलभ केली, त्या कायद्यांमुळे स्थानिकांवर अन्याय होत असून, यामागे नीती नाही, फक्त निधी' हेच सरकारचे धोरण दिसते. त्यांनी या कायद्यांचे पर्यावरणीय आणि सामाजिक दुष्परिणाम गंभीरपणे मांडले.

टॅक्सी ॲग्रीगेटर संदर्भातील नवीन मार्गदर्शक तत्त्वांवर फर्नांडिस यांनी सरकारवर टीका करत सांगितले की, स्थानिक टॅक्सी चालकांशी कोणतीही चर्चा न करता या नियमांची आखणी करण्यात आली आहे. यामुळे हजारो कुटुंबांचे उपजीविकेवर संकट निर्माण होणार आहे. त्यांनी या धोरणाला उद्योग व पर्यटन क्षेत्रातील अपयशाचे लक्षण ठरवले.

गेल्या वर्षभरात संसदेत उचललेले मुद्दे सांगताना फर्नांडिस यांनी म्हादई पाणी वळवण प्रकरण, कोळसा प्रदूषण, दुहेरी ट्रॅक प्रकल्प, एसटी आरक्षण, आणि धार्मिक स्थळांचे रक्षण अशा अनेक मुद्द्यांचा आढावा दिला. त्यांनी पंचायत राज अंमलबजावणी, गोव्यातील तिर्थस्थळांना युनेस्को दर्जा मिळावा, आणि पर्यावरणीय संवेदनशील भागांचे रक्षण यावरही भर दिला.

जागतीक पर्यावरण दिन विशेष

स्वच्छ पर्यावरणाचा अधिकार हा भारतीय नागरिकांचा मूलभूत अधिकार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट करताना, औद्योगिकीकरणाद्वारे होणाऱ्या प्रगतीचाही समतोल अधिकार असल्याचे अधोरेखित केले. हा ऐतिहासिक निर्णय केवळ कायदेशीर चौकटीपुरता मर्यादित राहत नाही, तर तो देशाच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनेला नवे परिमाण देतो. याच पार्श्वभूमीवर, गोवा या पर्यटनप्रधान राज्याला भेडसावत असलेल्या प्लास्टिक प्रदूषणाच्या समस्येवर या लेखात सखोल दृष्टिक्षेप टाकण्यात आला आहे. दरवर्षी वाढणारा प्लास्टिक कचरा, समुद्रकिनाऱ्यांचे होणारे प्रदूषण, पर्यटक आणि प्रशासनाची उदासीनता, आणि त्यावर उपाययोजना यांचा अभ्यास या लेखात करण्यात आला आहे.

शाश्वत विकासाची लढाई : पर्यावरण की प्रगती?

स्वच्छ पर्यावरणाचा अधिकार हा भारतीय नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे, यावर सर्वोच्च न्यायालयाने १७ मार्च २०२५ ला शिक्कामोर्तब केले. पण त्याचबरोबर औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून विकासाचा अधिकारही तितकाच महत्त्वाचा असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले . दोन्ही अधिकारांमध्ये समन्वय साधून शाश्वत विकास घडविणे ही काळाची गरज असल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले.

न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी आणि पी.बी. वराळे यांच्या खंडपीठाने या निकालात नमूद केले की, संविधानाच्या कलम १४ (समानतेचा अधिकार) आणि कलम २१ (जीवनाचा अधिकार) अंतर्गत स्वच्छ पर्यावरणाचा अधिकार संरक्षित आहे. मात्र, कलम १९ (व्यवसाय, व्यापार व उद्योगस्वातंत्र्य) आणि कलम २१ अंतर्गत औद्योगिक विकासाचाही समान अधिकार आहे, आणि दोघांमध्ये संघर्ष न करता सुव्यवस्था आवश्यक आहे.

हा ऐतिहासिक निर्णय एप्रिल २०२२मध्ये राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशाच्या विरोधात दिला गेला, ज्यामध्ये पुदुचेरीतील ऑरोव्हिल फाउंडेशनला त्यांच्या टाउनशिप विकास प्रकल्पांना स्थगिती देण्यात आली होती.

खंडपीठाने शाश्वत विकासाच्या संकल्पनेला दुजोरा देताना म्हटले की, शाश्वत विकास ही केवळ पर्यावरण रक्षणाची भूमिका बजावत नाही, तर गरिबी निर्मूलन व मानवी कल्याणासाठीही एक अत्यावश्यक आणि व्यावहारिक दृष्टीकोन आहे. खंडपीठाने ब्रुंडटलँड अहवालाचा संदर्भ देताना शाश्वत विकास म्हणजे भविष्यातील पिढ्यांच्या गरजा धोक्यात न आणता वर्तमान गरजा पूर्ण करणारा विकास, अशी व्याख्या पुढे मांडली.

ऑरोव्हिल टाउनशिपमध्ये रस्ते - विशेषतः क्राउन रोड आणि आउटर रिंग रोड - बांधकामाच्या विरोधात काही रहिवाशांनी हरित न्यायाधिकरणाकडे धाव घेतली होती. त्यांनी असा आरोप केला होता की हे प्रकल्प 'डार्कली फॉरेस्ट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वनक्षेत्रावर परिणाम करीत आहेत. एनजीटीने यावर ऑरोव्हिल फाउंडेशनला नव्याने टाउनशिप आराखडा तयार करण्याचे, पर्यावरणीय मान्यता घेण्याचे आणि तोपर्यंत सर्व बांधकाम थांबवण्याचे आदेश दिले होते.

मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश रद्द करताना स्पष्ट केले की, एनजीटीने आपले अधिकार ओलांडून कार्यवाही केली. न्यायालयाने नमूद केले की वादग्रस्त रस्त्यांचा समावेश असलेला ऑरोव्हिलचा मास्टर प्लॅन २००१ मध्येच मान्यताप्राप्त झाला असून, २०१० मध्ये अधिकृतपणे अधिसूचित करण्यात आला होता.

मास्टर प्लॅनच्या अंमलबजावणीत अडथळा आणणाऱ्या निर्णयांना केवळ सावधगिरीचे 'तत्त्व' या आधारावर न्यायालयीन मर्यादा ओलांडून समर्थन देता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच 'डार्कली फॉरेस्ट' हा परिसर खरेच डीम्ड फॉरेस्टच्या कायदेशीर व्याख्येत बसतो का, याबाबत एनजीटीकडे ठोस पुरावे नसल्याचेही न्यायालयाने अधोरेखित केले. एनजीटीच्या निष्कर्षात स्वतः नमूद करण्यात आले आहे की, संबंधित क्षेत्र हे मानवनिर्मित वृक्षारोपण आहे आणि अधिकृत नोंदींमध्ये तो कधीही जंगल म्हणून नमूद करण्यात आलेला नाही. या निर्णयामुळे विकास आणि पर्यावरण यांच्यातील संघर्षास नव्या दिशेने मार्गक्रमण मिळणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले हे मत देशभरात शाश्वत विकासाच्या चर्चेला नवसंजीवनी देणारे ठरणार आहे.

गोव्याच्या क्षेत्रफळाचा विचार केल्यास, प्रकल्पांचे नियोजन करताना किंवा गुंतवणूकदारांना आमंत्रित करण्यापूर्वी गोव्याच्या कॅरिंग कॅपॅसिटीचा सखोल अभ्यास करून अहवाल तयार करणे आवश्यक आहे. मुळात पर्यावरणाची हानी आणि विकास यामध्ये गोव्याच्या बाबतीत प्रचंड तफावत आहे. तशी ती संबंध देशात आहे. असा एक युक्तीवाद नेहमी केला जातो की , भारत हा विकसनशील देश आहे , आणि प्रगतीच्या मार्गावर दमदार पावले टाकताना पर्यावरण रक्षणाला अति महत्व देणे किंवा पर्यावरणाचे आंतरराष्ट्रीय निकष पाळणे भारताला परवडणारे नाही . परंतु या कारणालाच पर्यावरण तज्ज्ञांकडून आक्षेप घेतला जातोय. पर्यावरण रक्षणाला जर तुम्ही महत्त्व दिले नाही तर मानवनिमित आपत्तींची मोठी मालिकाच तुमच्या डोळ्यादेखत सुरू होवू शकते. वायनाड भुस्खलन हे त्याचं अलीकडच्या काळातलं एक महत्वाचं उदाहरण आहे. त्यामुळे पर्यावरण रक्षण हा मानवजातीच्या कल्याणासाठी अतिशय आवश्यक आणि कळीचा मुद्दा बनला आहे.

प्लास्टिक प्रदूषणाचा अंत हे यावर्षीच्या ५ जून २०२५ रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक पर्यावरण दिनाचे घोषवाक्य, केवळ प्रतीकात्मक नाही, तर भारतासारख्या विकसनशील देशासाठी ही तातडीची गरज आहे. भारतात दरवर्षी ९.५ दशलक्ष टन प्लास्टिक कचरा तयार होतो, त्यातही गोव्यासारख्या छोट्या पण पर्यटनदृष्ट्या गजबजलेल्या राज्याची भूमिका अस्वस्थ करणारी आहे.

पर्यटन आणि निसर्गसंपत्ती यांचा अनोखा मिलाफ असलेले गोवा आज एका भयावह संकटाच्या उंबरठ्यावर उभे आहे. प्लास्टिक कचऱ्याच्या अमर्याद निर्मितीचे संकट. सागरी किनाऱ्यांवरून समुद्रात वाहून जाणारा प्लास्टिक मलबा केवळ दृश्यप्रदूषण करत नाही, तर सागरी परिसंस्थेची हानीसुद्धा करतो.

आउटलुक प्लॅनेटच्या अहवालानुसार, गोव्यातील दरडोई प्लास्टिक कचरा निर्मिती

भारताच्या सरासरीपेक्षा ८ पट अधिक आहे. २०१८ ते २०२४ दरम्यान, गोव्यात दरवर्षी सरासरी २९,००० टन प्लास्टिक कचरा निर्माण झाला. म्हणजे दरडोई दरवर्षी सुमारे १२ किलो. भारतभरात सर्वोच्च. गोवा ही पर्यटन राजधानी असल्याने येथे दरवर्षी लाखो पर्यटक येतात. २०२३ मध्येच ८ लाखांहून अधिक पर्यटक गोव्यात दाखल झाले. हे पाहता कचऱ्यात पर्यटकांचे योगदान लक्षणीय आहे. एका पर्यटकाकडून दररोज १०२ ग्रॅम प्लास्टिक कचरा तयार होतो, तर रहिवाशाकडून केवळ ४६ ग्रॅम.

पर्यटकांचं एकदाच वापरणाऱ्या प्लास्टिकवर असलेलं अवलंबन, उदा. बाटल्या, स्ट्रॉ, पॅकेजिंग मटेरियल, ही समस्या अधिक तीव्र करते. तेथेच स्थानिक लोक काही अंशी कचरा व्यवस्थापन पद्धतींशी परिचित असतात, तर पर्यटकांना या प्रणालींबाबत ना माहिती असते, ना जबाबदारी.

गोवा कचरा व्यवस्थापन महामंडळ हे राज्यातील प्लास्टिक कचरा हाताळण्याचे प्रमुख उत्तरदायित्व असलेली यंत्रणा आहे. मात्र त्यांच्याकडे पुरेशा सुविधा नाहीत. अनेक ग्रामस्तरावर अजूनही प्लास्टिक कचरा व्यवस्थापन युनिट्स कार्यान्वित नाहीत, जरी केंद्र सरकारने यासाठी निधीची तरतूद केली असली तरी.

स्वच्छ भारत अभियानाचा ग्रामीण भागातील प्लास्टिक निर्मूलनाचा उद्देश अद्याप अंमलबजावणीत अडकला आहे. हे केवळ प्रशासकीय हलगर्जीचे लक्षण नाही, तर पर्यावरणीय जबाबदारीच्या अंगभूत अपयशाचे प्रतीक आहे.

गोव्यात शाश्वत पुनर्वापर संस्कृती रुजवण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि वित्तीय तरतूदीची कमतरता आहे. तज्ज्ञांचे मत आहे की, दरवर्षी किमान ₹५०० कोटी रुपये प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी राखून ठेवले पाहिजेत. या निधीतून पुनर्वापर केंद्रे, आधुनिक प्रक्रिया प्रकल्प आणि कचऱ्यापासून ऊर्जा निर्मितीच्या उपाययोजना उभारता येऊ शकतात.

याशिवाय, पर्यटकांकडून मिळणाऱ्या महसुलातून पर्यावरणीय 'पर्यटन कर' किंवा एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकवर विशेष अधिभार लावून निधी निर्माण करता येईल. प्लास्टिकच्या एकदाच वापराच्या वस्तूंवर बंदी असली तरी त्याची काटेकोर अंमलबजावणी अद्याप दूरची गोष्ट आहे. पर्यटक घनदाट भागांत सिंगल-यूज प्लास्टिकवर तात्काळ बंदी लागू करणे आवश्यक आहे.

पर्यटकांना कचरा पृथक्करण, पुनर्वापर आणि स्थानिक पर्यावरणीय धोरणांबद्दल जागरूक करणे अत्यंत गरजेचे आहे. पंचायतींना कचरा व्यवस्थापनासाठी अधिक अधिकार आणि निधी देणे, तसेच सार्वजनिक-खाजगी भागीदारी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. कचरा ते ऊर्जा प्रकल्प, मोबाईल रिसायकलिंग युनिट्स आणि समुद्रकिनाऱ्यांवरील 'स्मार्ट कचरा कलेक्शन' उपाय मोठ्या प्रमाणावर राबवल्या गेल्या पाहिजेत.

गोव्याची नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यटन हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचे मुख्य आधारस्तंभ आहेत. पण प्लास्टिकच्या गर्तेत गोवा हळूहळू बुडत आहे. तातडीने उपाययोजना न केल्यास, पर्यावरणीय समतोल ढासळेल आणि गोव्यातील पर्यटन उद्योगही दीर्घकालीन अडचणीत सापडेल. प्लास्टिक प्रदूषणावर नुसते बंधन नाही, तर प्रभावी अंमलबजावणी, व्यापक जनजागृती आणि धोरणात्मक निधी वाटप हाच गोव्याच्या निसर्गाच्या आणि भविष्यातल्या पिढ्यांच्या रक्षणाचा खरा मार्ग आहे.